शासकीय दूध शितकरण केंद्र, कर्जत हे कर्जत तालुका सह. दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., कर्जत या संघास भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमएलके-२०१८/प्र.क्र.६०/पदुम-१०

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: २० सप्टेंबर, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक: एमएलके-२००१/ प्र.क्र.३७६/२००१/ पदुम-१०, दि. ११/११/२००२
२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. एमएलके-१२०४/प्र.क्र.२९४/पदुम १०, दि. ४/११/२००५
३) कर्जत तालुका सह. दूध व्यवसायिक व प्रक्रिया संघ, कर्जत यांचे पत्र क्र. संकलन/ शा.शि. केंद्र /१६/२०१९, दि.२३/५/२०१९
४) आयुक्त,दुग्धव्यवसाय विकास कार्यालयाचे पत्र क्र. आदुवि -९/शा.दु.शी.केंद्र. कर्जत/हस्तांतरण/कर्जत संघ/नस्ती क्र. १०१/ २०१९/५५/९५५, दि.१०/७/२०१९

प्रस्तावना :

शासकीय दूध योजनातील तोटा कमी करण्यासाठी शासकीय दूध योजना व शितकरण केंद्र सहकारी क्षेत्रातील दूध संघांना हस्तांतरीत करण्याबाबत संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये शासकीय दूध शीतकरण केंद्र, कर्जत हे कर्जत तालुका सह. दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., कर्जत, जिल्हा अहमदनगर या संघास कायमस्वरुपी काही अटी शर्तीच्या अधिन राहून हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती. तथापि कर्जत तालुका सह. दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., कर्जत, जिल्हा अहमदनगर संघाने आर्थिक अडचणीमुळे सन २०१८ पर्यंत सदर शासन निर्णयानुसार शासकीय दूध शितकरण केंद्र, कर्जतचा ताबा घेतला नाही.

तद्‌नंतर संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये कर्जत तालुका सह. दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., कर्जत, जिल्हा अहमदनगर या संघाने शितकरण केंद्र कर्जतची एक रकमी रक्कम ते भरण्यास तयार असून सदर शितकरण केंद्र त्यांना मालकी हक्काने हस्तांतरीत करण्याबाबत जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे विनंती केली होती. सदर विनंतीनुसार आयुक्त (दुग्ध) यांनी संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये शितकरण केंद्र, कर्जतची सन २०१९-२०२० च्या पुनर्मुल्यांकनानुसार रु.१,१८,०८,९९१/- (रु.एक कोटी अठरा लाख आठ हजार नऊशे एक्यान्नव) इतकी विक्री रक्कम निश्चित करुन शितकरण केंद्र, कर्जत हे कर्जत तालुका सह. दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., कर्जत या संघास कायमस्वरुपी मालकी हक्काने

हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या निर्णयार्थ सादर केला होता. सदर प्रकरणी आयुक्त (दुग्ध) यांनी संदर्भ क. ४ येथील पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव लक्षात घेऊन शितकरण केंद्र कर्जत हे कर्जत तालुका सह. दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., कर्जत, जिल्हा अहमदनगर या संघास हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन या निर्णयान्वये, शासकीय शितकरण केंद्र, कर्जत हे कर्जत तालुका सह. दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., कर्जत , जिल्हा अहमदनगर या संघास मालकी हक्काने न देता भाडेतत्वावर देण्यास मान्यता देत आहे.

२. शासकीय दूध शितकरण केंद्र, कर्जत हे भाडेतत्वावर कर्जत तालुका सह. दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., कर्जत यांना हस्तांतरण करण्याबाबतची पुढील कार्यवाही संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील नमूद अटी व शर्तीनुसार आयुक्त, दुग्धव्यवसाय यांनी करावी.

३. शासकीय दूध शितकरण केंद्र, कर्जत व तेथील जमीनीची भविष्यात शासनास आवश्यकता भासल्यास, सदर शितकरण केंद्राचे पुनर्प्रत्यार्पन शासनाकडे करणे संघावर बंधनकारक राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२११७५९२८५४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SWAPNALI
ARUN CHAVAN

Digitally signed by SWAPNALI ARUN CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=50635cec7caef92c815ed8a336874eaf0788426761b958eda8d0acf1db4ef418, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBA,
serialNumber=b8d3da23fcbe7b0e267e6caa12b1dc99b45a9b0b73bbec9e7560d40c354f06d3, ou=AGRICULTURE DEPARTMENT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNALI ARUN CHAVAN
Date: 2019.09.21 17:48:33 +05'30'

(स्व. अ. चव्हाण)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. अपर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-१८
८. महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा परिक्षा) मुंबई
९. महालेखापाल, महाराष्ट्र -२ (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर
१०.सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई

११. विभागीय उप निबंधक सहकारी संस्था (दुग्ध), नाशिक
१२. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नाशिक
१३. जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, अहमदनगर
१४. कार्यकारी संचालक, कर्जत तालुका सह. दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., कर्जत जिल्हा अहमदनगर
१५. निवड नस्ती - कार्यासन पदुम-८.